सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.dteamt.org

क्रमांक : विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/८८२
दिनांक १५/७/२०१५

प्रति,

प्राचार्य,
सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी संस्था.
सर्व विनाअनुदानित एम.बी.ए / एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था.

विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५०% प्रतिपूर्तीबाबत.

संदर्भ :- १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक १५/अर्थस/ईबीसी परिपत्रक/२०१४-१५/२३३ दि. २३ मार्च २०१५.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक १५/अर्थस/ईबीसी परिपत्रक/२०१४-१५/२४६ दि. ४ एप्रिल २०१५.

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास लाभार्थी विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी संलग्न/लिंक करणेबाबत विद्यार्थ्यांना सुचित करण्याबाबत संस्थांना या कार्यालयाचे पृष्ठांकन क्रमांक विकाअ/शिक्षण/EBC-ECS /२०१५/६६१ दिनांक २५/३/२०१५ अन्वये सुचना दिलेल्या आहेत. संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढणे सुलभ व्हावे याकरीता संस्थास्तरावर कॅम्प आयोजित करणेबाबत संबंधीत एजन्सीशी समन्वय साधणेसाठी यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील आर्थिकदृष्टया मागास पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक तसेच आधारकार्ड क्रमांक सलग्न केल्यावर त्यांचे बँक खाते क्रमांक माहिती संचालनालयाच्या dtemaharashtra.org.in या संकेतस्थळावर EBC Scholarship प्रणालीमध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना आपणास संस्थास्तरावरुन सुचित करावयाचे आहे. जेणे करुन विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही करणे सुलभ होईल, याची नोंद घ्यावी.

S. P. Pasebaud

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई यांना माहितीकरीता सादर.

३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.